VOL- IX | ISSUE- I | JANUARY | 2022 | PEER REVIEW e-JOURNAL | IMPACT FACTOR 7.331 | ISSN 2349-638x

# 'महाराष्ट्रातील पशुपालन' एक भौगोलिक अभ्यास

**डॉ.प्रा. एस.पी. घुगे**
भूगोल विभाग प्रमुख
कला व विज्ञान महाविद्यालय
शिवाजीनगर गढी
ता.गेवराई जि. बीड

**प्रस्तावना :-**

भारत हा एक कृषी प्रधान देश आहे. भारतात 70% लोक शेती व्यवसाय करतात. भारताची अर्थव्यवस्था कृषीवर आवलंबुन आहे. भारतातील कृषी व्यवस्था स्वतंत्र नसुन अनेक पुरक व्यवसायाशी संबंधीत आहे. भारतात कृषी व्यवसाया बरोबर दुय्यम व्यवसाय म्हणून पशुपालन व्यवसाय केला जातो. दुय्यम व्यवसाय सोडता कृषी व्यवसायाचे मोजमाप करता येत नाही. कृषी व्यवसायाचा विकास करण्यासाठी पशुपालन व्यवसायाची जोड अत्यंत महत्वाची मानली आहे. पशुपालन व्यवसाय अंतर्गत शेतीची कामे, दुग्ध व्यवसाय, लोकर व्यवसाय, कातडी कमवणे, इ. प्राप्तीसाठी पशुपालन व्यवसाय केला जातो.

सन 2003 साली पशु जणगननेनुसार भारतात 18.5% कोटी गोवेश पशु 9.8% टक्के म्हैस वर्गीय पशु 12.8% टक्के कोटी शेळ्या होत्या. भारतात मध्यप्रदेशचा पाळीव पशु पालन व्यवसायात प्रथम क्रमांक लागतो. भारतात पशुधनातील महाराष्ट्राचा 7.6% टक्के हीस्सा होता. दर लाख लोकसंख्या मागे ६.६६९% इतके पशुधन होते. पशुधनाची घनता दर चौ.कि.मी. मागे 920 होती. प्रस्तुत शोध निबंध हा महाराष्ट्र राज्यातील पशुधनात बदल अभ्यासणे हा संशोधनाचा प्रमुख उद्देश आहे.

महाराष्ट्र राज्याचा अक्षवृतीय विस्तार हा १५°४४' उत्तर अक्षवृत्त ते २२°६' उत्तर अक्षवृत्त आहे. तर रेखावृतीय विस्तार हा ७२°६६' पूर्व रेखावृत्त ते ८०°५४' पूर्व रेखावृत्त आहे.

महाराष्ट्र राज्याची दक्षिण उत्तर लांबी 720% कि.मी असून पूर्व – पश्चिम लांबी सुमारे ८00 कि.मी आहे. महाराष्ट्र राज्य पश्चिमेस अरबी समुद्रापासून ते पूर्वेस पूर्व घाटापर्यंत पसरलेला आहे. महाराष्ट्र राज्याची प्राकृतिक रचना वैशिष्ट्यपुर्ण आढळते. महाराष्ट्र राज्य हे दख्खनच्या पठार या नावाने ओळखले जाते. प्राकृतिक रचनेचा वैशिठ्यानुसार चार विभाग पडतात. 1) कोकण किनारपट्टी 2) सह्याद्री पर्वत रांग 3) पूर्वेकडील पठारी प्रदेश 4) उत्तरेकडील सातपुडा पर्वत रांग

महाराष्ट्र राज्याचे हवामान मौसमी स्वरुपाचे आहे. महाराष्ट्राच्या प्राकृतीक रचनेचा परीणाम हवामानावर होतो. जुन ते सप्टेंबर महीन्यात पाऊस पडतो. सरासरी पर्जन्यमान 650 मी.मी. ते 750 मी.मी. इतके आसते. महाराष्ट्र राज्याचे क्षेत्रफळ 307713 चौ.की.मी भरताच्या एकूण क्षेत्रफळात महाराष्ट्र राज्याचा 9.36% भाग व्यापलेले आहे. सन 2011 च्या जनगणनेनुसार महाराष्ट्राची लोकसंख्या 11.24% कोटी असून लोकसंख्याची घनता 365 आहे. महाराष्ट्रात पशुधन 2012 नुसार सुमारे 3.25 कोटी असुन दर लाख लोकसंख्येमागे पशुधन 41,995 इतके होते.

**तक्ता क्.01**

**महाराष्ट्र राज्यातील पशुगणना 2012 नुसार** – (000)

| पशुवैद्यकीय विभाग | गाई / बैल | म्हशी / रेडे | शेळ्या / मैंढ्या | इतर | एकूण | एकूण कुकुटपदी पक्षी |
|---|---|---|---|---|---|---|
| **मुंबई** | 1106 | 397 | 365 | 16 | 1884 | 10512 |
| **नाशीक** | 3688 | 889 | 3268 | 126 | 7971 | 27575 |
| **पुणे** | 248 | 220 | 291 | 56 | 765 | 3099 |

| | 8 | 2 | 3 | | 9 | 7 |
|---|---|---|---|---|---|---|
| औरंगाबाद | 1936 | 510 | 1163 | 59 | 3668 | 2207 |
| लातूर | 1643 | 683 | 781 | 39 | 3146 | 1507 |
| अमरावती | 2248 | 453 | 1338 | 44 | 4083 | 1773 |
| नागपूर | 2375 | 461 | 1188 | 54 | 4078 | 3224 |
| एकूण राज्य | 15484 | 5595 | 11016 | 394 | 32489 | 77754 |
| एक्केवारी | 8.1 % | 5.1 % | 5.5 % | 3.2 % | 6.3 % | 10.7 % |
| भारत | 190904 | 108702 | 200242 | 12209 | 512057 | 729209 |

संदर्भ — आधार :- पशुसंवर्धन कार्यालय, महाराष्ट्र शासन

तक्ता क्र.01 वरुन असे निदर्शनास येते की, महाराष्ट्र राज्यातील सन 2012 साली राज्यात एकोनीसावी पशुधन गणना आकडेवारी आसुन राज्यात सुमारे 3.25% कोटी पशुधन आसुन राज्याचा भारतात सहावा क्रमांक लागतो. सन 2012 मध्ये जवळपास 29000 पशुधन घेणे त्यामध्ये कुकुटपदी पक्षाची संख्या 7.78% कोटी आसुन भारतात महाराष्ट्र राज्याचा कुटुटपदी पक्षाच्या आकडेवारीमध्ये तिसरा क्रमांक लागतो. महाराष्ट्र राज्यातील विभाग निहाय गणने नुसार मुंबई विभागात एकुण पशुधन (1884) सर्वात कमी आसुन नाशीक विभागत एकूण पशुधन ( 7971) सर्वात जास्त आढळते. महाराष्ट्र राज्यामध्ये गाई बैल पशुधन संख्या (15484) 8.1% टक्के सर्व पशुधनात जास्त आसुन इतर पशुधन (394) 3.2% सर्वात कमी पशुधन आहे. महाराष्ट्र राज्यात एकूण पशुधन (32489) 6.3% इतके असुन गाईबैल ( 8.1%) म्हशी / रेडे ( 5.1%) शेळ्या मेंढ्य (5.5%) इतर (3.2%) असुन भारतामध्ये गाई बैल पशुधनात चौथा क्रमांक लागतो तर म्हशी / रेडे पशुधनात आठवा क्रमांक लागतो तर शेळ्या मेंढ्या पशुधनात सहावा क्रमांक लागतो.

महाराष्ट्रामध्ये पशुधनात कुकुटपदी पक्षी गनणेनुसार (77754) (10.7%) आसुन पुणे विभागात सर्वात जास्त कुकुटपदी पक्षी ( 30997) इतके आहेत. तर सर्वात कमी कुकुटपदी पक्षी ( 1507) लातुर विभागात आहेत. महाराष्ट्रातील एकुण पशुधन गनणेमध्ये कुकुटपदी पक्षाची संख्या जास्त आहे.

**तक्ता क्र. 02**

**महाराष्ट्रातील पशुधन व कुकुटादी पक्ष्यांचे उत्पादन —**

| अ.क्र | वर्ष | मांस (000 मे.टन) | दुध (000 मे.टन) | अंडी (कोटी) | लोकर (०००) kg |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2014-15 | 631 | 9542 | 508 | 1386 |
| 2 | 2015-16 | 675 | 10153 | 529 | 1390 |
| 3 | 2016-17 | 845 | 10402 | 548 | 1407 |

संदर्भ :- पशुसंवर्धन आयुक्त कार्यालय, महाराष्ट्र शासन.

तक्ता क्र.2 वरुन महाराष्ट्र राज्यातील पशुधन उत्पादन सन 2014-15 ते 2016-17 या वर्षातील राज्यात उपलब्ध झालेले उत्पादन दर्शवीत आहे. यामध्ये मांस उत्पादनात वाढ झालेली दिसून येते. (845) मै.टन) महाराष्ट्रात पशुधन व्यवसाय 2014-15 ला मिळणारे उत्पादन 9542 हजार मे.टन होते त्यात वाढ होऊन सन 2016-17 मध्ये 10402 मे.टन झालेले दिसून येते. अंडी उत्पादन सुध्दा वाढ झालेली दिसून येते. सन 2014-15 मध्ये (508) कोटी उत्पादन होते ते 2016-17 मध्ये 548 कोटी झालेले आहे.पशुधन व्यवसायात शेळ्या, मेढ्या मधुन मिळणारे लोकर उत्पादन सन 2014-15 मध्ये 1386 कि.ग्रॅम होते तर सन 2016-17 मध्ये 1407 की.ग्रॅम झालेले दिसून येते. एकंदरीत महाराष्ट्रात पशुपालन व्यवसायाला चालनामिळाली असुन पशुधनामध्ये वाढ झालेली आहे. व पशुधन वाढीमुळे उत्पदनात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

**निष्कर्ष :-**

1) शेती व्यवसाया बरोबर पशुपालन व्यवसाय व्यापारी तत्वावर केला जात आहे.
2) पशुपालन व्यवसाय फक्त उदनिर्वाहसाठी भागविण्यासाठी केला जात नसुन त्याला व्यापाराचे स्वरुप प्राप्त झाले आहे.

3) महाराष्ट्रातील हवामान नेहमी बदलणारे आसल्याने त्याचा परीणाम पशुधनावर झालेला दिसून येतो.
4) कृषी क्षेत्रामध्ये आधुनिकीकरण झाल्याने पशुपालन व्यवसायामध्ये घट झालेली दिसून येते.

**संदर्भ सूची :-**

1) 'भारताचा भूगोल' ( 1997), डॉ.पांडूरंग केचे, के.एस. आतकरे कैलास पब्लीकेशन, औरंगपुरा, औरंगाबाद.
2) 'कृषी भूगोल' ( 2004), डॉ.अरुण राजाराम कुंभार, पाटाल पब्लीकेशन 686, सदाशीव पेठ, पोठ्ट ऑफीस जवळ, पुणे – 30.
3) 'आर्थीक भूगोल' ( 2014), प्रा.डॉ. राजाराम चौधरी अनील आतकरे, के.एस.पब्लीकेशन, नारायण पेढ, पुणे – 30.
4) 'भारतीय आर्थव्यवस्था' (1998), देव झायरे, मनोहर पिंपळापुरे, महाल, नागपुर – 440002.
5) 'असा हा महाराष्ट्' (2004), डॉ.सुरेश फुले अभीजीत पब्लीकेशन, मजगे नगर, नंदनवन कॉलनी, कब्जा रोड, लातूर.
6) 'महाराष्ट्राची आर्थीक पाटणी' ( 2017-18), DES अर्थ व सांख्यीकी संचालनालय नियोजन विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई.
७) 'महारास्ट्र शासन' (२००७), पशुपालन अहवाल.